महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक :- एनओटी-३६१७/सीआर-२४/२०२०/ २१ दिनांक: ७ फेब्रुवारी, २०२३

## प्रसिध्दीपत्रक

**विषय**:- दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग मुख्य परीक्षा-२०२१ गुण व अंतिम निकालानंतरची गुणांची फेरपडताळणी.

**संदर्भ**:- १. पूर्व परीक्षा जाहिरात क्र.२७०/२०२१, दिनांक २३ डिसेंबर, २०२१
२. मुख्य परीक्षा जाहिरात क्र. ४८/२०२२, दिनांक २७ मे, २०२२
३.आयोगाचे क्रमांक - एनओटी-३६१७/सीआर-२४/२०२०/२१, दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक ०२ जुलै, २०२२ रोजी घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग मुख्य परीक्षा-२०२१ च्या लेखी परीक्षेचा अंतिम निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. गुणवत्तायादीतील उमेदवारांना त्यांचे गुण उमेदवारांच्या खात्यामधील संबंधित परीक्षेच्या नावासमोरील ‘View’ अंतर्गत उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच, गुणांची फेरपडताळणी (Retotalling) करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना गुणांच्या फेरपडताळणीकरीता अर्ज सादर करण्यासाठी दुवा (वेबलिंक) उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे:-

(१) आयोगाच्या http://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Retotalling of Marks या लिंकवर क्लिक करावे.
(२) उपलब्ध होणाऱ्या परीक्षांच्या यादीमधून संबंधित परीक्षेची निवड करावी.
(३) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करून सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करून लॉगीन करावे.
(४) Retotalling संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.
(५) उपलब्ध होणाऱ्या गुणपत्रातील गुणांची फेरपडताळणी करावयाची असलेल्या एक किंवा जास्त विषयाची निवड करून ‘Save’ बटणवर क्लिक करावे.
(६) निवड केलेल्या विषयानुसार सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा करावे.

३. गुणांच्या फेरपडताळणीकरीताची सदर वेबलिंक दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ ते दिनांक १७ फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत उपलब्ध करून देण्यात येत आहे

४. उपरोक्त विहित कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेरपडताळणीकरीता अर्ज करताना कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर संपर्क साधता येईल.

ठिकाण :- मुंबई

उपसचिव,परीक्षोत्तर राजपत्रित परीक्षा
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.